# मुंबई विद्यापीठ

क्र. आरइजी/आयसीसी/२०२५-२६/१७

## परिपत्रक :-

**विषय: राष्ट्रीय गीत: "वंदे मातरम" सामूहिक गायन**

वंदे मातरम!

मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य आणि सर्व शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख व संचालक यांना असे सूचित करण्यात येते की, भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात "वंदे मातरम" या राष्ट्रीय गीताला अद्वितीय स्थान आहे. भारताचे सुप्रसिद्ध कवी, कादंबरीकार, विचारवंत आणि देशभक्त साहित्यिक **बंकिमचंद्र चट्टोपाध्याय** यांनी हे गीत आपल्या 'आनंदमठ' या कादंबरीमध्ये रचले.

"वंदे मातरम" हे गीत देशभक्ती, स्वाभिमान व बलिदानाची भावना जागृत करणारे गीत आहे. "वंदे मातरम" या घोषणेने असंख्य स्वातंत्र्य वीरांना ब्रिटीशांविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. आंदोलने, सभा व मोर्चात हे गीत गायले गेले आणि ते राष्ट्रीय चळवळीचे प्रतीक बनले. सन १९५० मध्ये संविधान स्वीकृती वेळी "वंदे मातरम" या गीताला अधिकृतरित्या भारताचे 'राष्ट्रीय गीत' म्हणून मान्यता देण्यात आली.

दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी "वंदे मातरम" या राष्ट्रीय गीताच्या रचनेला १५० वर्ष पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक घटनेचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यामध्ये 'वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने वंदे मातरम गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय समिती स्थापन केली आहे आणि या समितीच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठे व विद्यापीठांच्या संलग्नीत महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमांच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठांचे सर्व शैक्षणिक विभाग यांना कळविण्यात येते की ७ नोहेंबर २०२५ रोजी आपापल्या महाविद्यालयामध्ये तसेच शैक्षणिक विभागांमध्ये सकाळी १०:३० वाजता सर्व विद्यार्थी व शिक्षक सर्वांनी सामुहिकरित्या "वंदे मातरम" राष्ट्रीय गीताचे गायन करावे. "वंदे मातरम" राष्ट्रीय गीताचे गायन करताना राष्ट्रीय गीताच्या सन्मानाचे सर्व शिष्टाचार पाळावेत. तसेच वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सव साजरा करताना महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय समितीने सुचविलेलेच कार्यक्रम आयोजित करावे. सदर कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये काही बदल राज्यासमितीने सुचविल्यास ते स्वतंत्रपणे कळविण्यात येतील.

राष्ट्रीय गीत गायन कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर त्वरित पुढील लिंकवर कार्यक्रमाचा अहवाल पाठवावा :
https://forms.gle/12ZZdCEafKWjxxR16

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२५
ठिकाण : मुंबई – ४०० ०३२

प्रति,
मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य
मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख व संचालक

प्रत माहितीसाठी रवाना
स्वीय सहाय्यक (१) मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ (२) मा. प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ